मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# विरोधकांच्या टीकेवर लक्ष देऊ नका, कोणतीही योजना बंद होणार नाही : अजितदादा पवार

## महाराष्ट्र राज्य मजबूत असून आर्थिक परिस्थिती मजबूत आहे : विविध विकासकामांचे उद्घाटन, लोकार्पण आणि भूमिपूजन पवार यांच्या हस्ते झाले

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्याच्या तिजोरीत खडखडाट, राज्य दिवाळखोरीत निघाल्याची टीका विरोधक करत आहेत. त्याकडे लक्ष देऊ नका मी राज्याचा दहावा अर्थसंकल्प मांडला आहे. महाराष्ट्र राज्य मजबूत असून आर्थिक परिस्थिती मजबूत आहे. देशात सर्वात जास्त वस्तू व सेवा कर (जीएसटी) महाराष्ट्राला मिळतो. त्यामुळे राज्याची आर्थिक परिस्थिती चांगली असल्याने लाडकी बहीणसह कोणतीही योजना बंद करण्यात येणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.



पिंपरी-चिंचवड शहरातील विविध विकासकामांचे उद्घाटन, लोकार्पण आणि भूमिपूजन पवार यांच्या हस्ते झाले. खासदार श्रीरंग बारणे, आमदार अण्णा बनसोडे, महेश लांडगे, अश्विनी जगताप, महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर उपस्थित होते. अजित पवार म्हणाले, पिंपरी-चिंचवड औद्योगिकनगरी आहे. त्यात शहराची लोकसंख्या वाढली आहे. त्यामुळे मूलभूत गरजाचा पोहचवता आले पाहिजे. शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. सुविधा पुरविताना ताण येत आहे. राज्याच्या विकासाचे इंजिन म्हणून शहराकडे पाहिले जात. पाण्याची समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. लोकप्रतिनिधीच्या कामांना प्राधान्य द्यावे, अशी सूचना आयुक्तांना दिली. राहिलेली कामे जोमाने होतील, मेट्रोचे कामे लवकर कशी होतील, याकडे पाहिले पाहिजे. कायदा सुव्यवस्था चांगली राहिली पाहिजे. नागरिकांना मोकळेपणाने फिरता आले पाहिजे. कोणाकडूनही चुक होता कामा नये, दहशत, गुंडगिरी, दादागिरी खपवून घेतली जाणार नाही, अशा सूचना पोलीस आयुक्त यांना दिल्या आहेत. शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांची विचारसरणी अंगिकरून आपण समाजात वावरले पाहिजे. देशात पहिल्या क्रमांकाचे राज्य करत असताना सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे.

### या कामांचे लोकार्पण आणि भूमिपूजन झाले..

» बोपखेल येथे मुळा नदीवर उभारण्यात आलेल्या पुलाच्या लोकार्पण, पोलीस आयुक्तालय यांच्या वतीने स्थायी आदेश पुस्तिकेचे प्रकाशन व नवीन शासकीय वाहनांना हिरवा झेंडा दाखविण्याचा कार्यक्रम होणार आहे. इंटिग्रेटेड कमांड कंट्रोल (आयसीसीसी)चे लोकार्पण, निगडी प्राधिकरण येथे हरित सेतू विषयक कामांचे लोकार्पण, पिंपळे सौदागर येथील पवना नदीवर उभारलेल्या पुलाचे लोकार्पण, रक्षक चौकात सांगवी फाटा ते किवळे रस्त्यावर भुयारी मार्ग (सबवे ) उभारण्याच्या कामाचे भूमिपूजन झाले. पिंपरी-चिंचवड महापालिका व पुणे महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने मुळा नदीकाठ सुधारणा प्रकल्प टप्पा एकचे शुभारंभ, मुळा नदीवर सांगवी ते बोपोडी दरम्यान उभारण्यात आलेल्या पुलाचे लोकार्पण झाले. पिंपरीत माता रमाई स्मारकाचे काम हाती घेण्याची सूचनाही पवार यांनी केली.

# चिंचवड विधानसभेतील रावेत ते वाकड भागात वाढणार 'कनेक्टिव्हीटी'

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याहस्ते विविध रस्त्यांचे भूमिपूजन : भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या रावेत, किवळे, पुनावळे, ताथवडे आणि वाकड भागातील प्रस्तावित रस्त्यांच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले. या रस्त्यांमुळे पुणे-मुंबई महामार्गालगत झपाट्याने विकसित होणाऱ्या या गावांतील 'कनेक्टिव्हीटी' वाढणार आहे. या रस्त्यांना गती देण्यासाठी भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे.

चिंचवड विधानसभा मतदार संघासह शहरातील विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शहरातील लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

चिंचवड विधानसभा मतदार संघातील मामुर्डी किवळे येथील १८ मीटर व १२ मीटर डी.पी. रस्ता, किवळे व रावेत हद्दीवरील १८ मीटर डी.पी. व इतर रस्ते, मुकाई चौक ते शिंदे पेट्रोल पंपपर्यंत डी.पी. रस्ता, प्रभाग क्रमांक २५ मधील पुनावळे येथील मुंबई-बंगळुरू हायवेपासून काटेवस्तीकडे जाणारा ३० मीटर डी.पी. रस्ता, कोयते वस्ती चौक ते जांबे गावाकडे जाणारा १८ मी. डी.पी. रस्ता, ताथवडे गावातून जीवननगरमार्गे एमटीयू कंपनीकडे जाणारा १८ मी. डी.पी. रस्ता, पुनावळे बी. आर.टी. रोडपासून पुनावळे गावठाणातून जाणारा १८ मी. रुंद डी.पी. रस्ता, गायकवाडनगरमधील १८ मी. रुंद डी.पी. रस्त्याची स्थापत्य विषयक कामे यासह वाकड येथील टिपटॉप हॉटेलपासून अटलांटा २ सोसायटीकडे जाणारा १८ मी. डी.पी. रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले. यासह सांगवी फाटा ते किवळे रस्त्यावर रक्षक चौके येथे सब-वे बांधण्याचे कामही हाती घेण्यात आले आहे.



### सोसायटीधारक, आयटीएन्सला दिलासा...

» रावेत, किवळे, पुनावळे, ताथवडे, वाकड या पट्ट्यामध्ये हिंजवडी आयटी पार्कमधील आयटीएन्स मोठ्या प्रमाणात वास्तव्य करतात. पुणे-मुंबई महामार्गाच्या दोन्ही बाजुला गेल्या १० ते १५ वर्षांमध्ये लोकवस्ती प्रचंड वाढली आहे. त्यामुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न ऐरणीवर आला होता. रस्त्यांच्या विकासकामांमुळे वाहतुककोंडी कमी होणार असून, रहिवाशांची सोय होऊन प्रदूषण कमी होण्यास मदत होणार आहे. वाकड भागातील भूमकर चौक व भुजबळ चौकामधील रस्त्याच्या बांधणीनंतर सध्या होणाऱ्या वाहतूक कोंडीस शहरवासीयांना सामोरे जावे लागणार नाही. सदर विविध रस्त्यांच्या विकास योजनांमुळे सुनियोजित पार्किंग व्यवस्था निर्माण होणार आहे. नागरिकांना आरामदायी प्रवास, दळणवळणासाठी सुसज्ज रस्ते, सुरक्षित पदपथ (पेडेस्ट्रीयन फ्रेंडली फुटपाथ) उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे सोसयटीधारक, आयटीएन्सला दिलासा मिळाला आहे.

" वाढते नागरीकरण आणि वाहनांच्या संख्येमुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. विकास आराखड्याप्रमाणे विविध रस्ते विकसित करण्यासाठी सातत्याने आम्ही पाठपुरावा करीत आहोत. रावेत, किवळे, पुनावळे, ताथवडे, वाकड भागातील विविध भागांना जोडणाऱ्या रस्त्यांच्या कामांना आता चालना मिळाली आहे. अनेक ठिकाणी डीपी रस्ते विकसित करताना भूसंपादन हा प्रमुख अडथळा आहे. त्यामुळे तांत्रिक अडचणींमुळे अनेक रस्त्यांची कामे प्रलंबित राहतात. मात्र, आगामी काळात दळणवळणाची स्थिती सुधारण्यासाठी 'अ‍ॅक्शन प्लॅन' तयार करणार आहे. प्रशासनाने सदर रस्त्यांची कामे गतीने पूर्ण करावीत, अशी अपेक्षा आहे.

**- शंकर जगताप, शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

# महापालिकेच्या वर्धापनदिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

## विविध सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा स्पर्धा तसेच शिबिरांचे आयोजन



**पिंपरी | प्रतिनिधी**

वारकरी सांप्रदायाची पार्श्वभूमी लाभलेले पिंपरी चिंचवड शहर औद्योगिक नगरी म्हणून नावारूपास आले. या शहराचे विकासाच्या दृष्टीने पुढे पाऊल पडत असून कटिबद्ध जनहिताय हे ब्रीदवाक्य असलेल्या पिंपरी चिंचवड महापालिकेचा ४२ वा स्थापना दिवस दि. ११ ऑक्टोबर रोजी जल्लोषात साजरा होत आहे. यानिमित्त महापालिकेच्या वतीने विविध सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा स्पर्धा तसेच शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमासाठी केंद्रीय नागरी विमान वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यासह महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, खासदार मेधा कुलकर्णी, सुनेत्रा पवार, वंदना चव्हाण, सुप्रिया सुळे, श्रीरंग बारणे, डॉ. अमोल कोल्हे, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, संग्राम थोपटे, अण्णा बनसोडे, महेश लांडगे, अश्विनी जगताप यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. तसेच अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर आणि महापालिकेचे सर्व अधिकारी, कर्मचारी यांची देखील उपस्थिती असले.

# महापालिका आयुक्तांकडून अतिक्रमण निरीक्षकांच्या बदलीचे आदेश

## पुणे महापालिकेचा अतिक्रमण निरीक्षकांना दणका; आता तरी कारवाईला वेग येणार का, पुणेकरांनी उपस्थित केला प्रश्न

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरातील प्रत्येक ठिकाणी अतिक्रमणवाढीला अतिक्रमण विभागातील अधिकाऱ्यांचाच आशीर्वाद असल्याचे महापालिका प्रशासनानेच मान्य केले आहे. त्यामुळे कारवाई करूनच फायदा होत नव्हता. यावर उपाय म्हणून वर्षानुवर्षे एकाच जागी ठाण मांडून बसलेल्या अतिक्रमण निरीक्षकांची महापालिका आयुक्तांनी मक्तेदारी मोडीत काढत बदली आदेश दिले आहेत.

शहरात अनेक ठिकाणी अतिक्रमण कारवाई करण्यापूर्वीच कारवाईची माहिती संबंधितांना पोहोचवली जात होती. हे प्रकार रोखण्यासाठी महापालिका प्रशासनाने आता अतिक्रमण निरीक्षकांच्या बदल्या दर तीन महिन्यांनी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता तरी शहर अतिक्रमण मुक्त पाहण्यास मिळेल का, असा प्रश्न पुणेकरांनी उपस्थित केला आहे.

शहरातील मध्यवर्ती पेठांसह, बाजारपेठेशिवाय इतर रस्त्यांवर अतिक्रमणे वाढली आहेत. त्यामुळे नागरिकांना रस्त्यावरून जाताना जीव मुठीत धरून जावे लागत आहे. त्यावर केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पुणे महापालिका प्रशासनाला राजकीय दबावाला बळी न पडता थेट कारवाईचे निर्देश दिले होते. त्यानंतर महापालिकेने शहरातील पाच झोनमध्ये अतिक्रमण कारवाईच्या नियोजनाचा आराखडा तयार केला होता. परंतु हा आराखडा कारवाईपूर्वी फुटला होता. त्यामुळे कारवाईमध्ये पारदर्शकता राहिली नव्हती.

वर्षानुवर्षे एकाच भागात नियुक्तीस असलेले अतिक्रमण निरीक्षकांचे लागेबंध तयार झाले होते. केवळ कारवाई दाखविण्यात येत होती. परंतु त्यावर मार्ग निघत नव्हता. हा प्रकार मान्य करत महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी निरीक्षकांच्या बदल्याचे आदेश दिले.




### अन्न पदार्थ शिजवण्यास बंदी, कारवाई करणार

» नेमून दिलेल्या ठिकाणी व्यावसायिकांकडून खाद्य पदार्थांची विक्री करायची असेल तर ते पदार्थ त्या ठिकाणी शिजवता येणार नाहीत, असा नियम आहे. परंतु सगळीकडे महापालिकेच्या अधिकाऱ्यांच्या डोळ्यादेखत हा प्रकार सुरू होता. आता कारवाईदरम्यान हा प्रकार बंद केला जाणार असून साहित्य किंवा वस्तू उचलल्या जाणार आहेत.

### पथारीधारकांचे आक्षेप

» पथारी शुल्क पूर्ण भरलेले आहे, अशा पथारी व्यावसायिकांना अतिक्रमण विभागाकडून त्रास दिला जात असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत.

» बेकायदा स्टॉल आणि खाद्य पदार्थ विक्री करणाऱ्या गाड्या यांच्याकडे अतिक्रमण विभागाचे दुर्लक्ष होत आहे. त्यांच्यावर कारवाई करण्याऐवजी नियमानुसार वागणाऱ्या पथारी व्यावसायिकांना त्रास दिला जात आहे.

» अतिक्रमण निर्मूलन कारवाईवेळी पालिकेच्या वाहनांसोबत येणाऱ्या कंत्राटी कामगारांच्या चारित्र्याची पडताळणी केली जायला हवी. हे कर्मचारी पथारीधारकांशी अतिशय उर्मट आहे उद्धटपणे वागतात. त्यांच्यावर दमदाटी आणि दादागिरी करतात.

» पथारी व्यावसायिक स्वयंरोजगार करतात. कोणताही बेकायदा धंदा करीत नाहीत. पालिकेचे अतिक्रमण विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी त्यांना गुन्हेगारांसारखी वागणूक देतात. त्यांना याबाबत कडक सूचना देण्याची आवश्यकता आहे

“ महापालिका आयुक्तांनी दिलेल्या आदेशानुसार ८६ अतिक्रमण निरीक्षकांच्या बदलीचे आदेश काढण्यात आले आहेत. अनेक वर्षांपासून एकाच भागात हे निरीक्षक नेमणुकीस असल्याने त्यांचे व्यावसायिकांशी लागेबंध असल्याचे आढळून आले होते. त्यामुळेच त्यांनी निर्माण केलेली मक्तेदारी मोडीस काढली आहे. आता शहरात अतिक्रमण विरोधी कारवाई तीव्र केली जाणार आहे.

**- सोमनाथ बनकर, प्रमुख, अतिक्रमण विभाग, पुणे महापालिका .**

# बिबट्या येताच ‘एआय’चे सायरन वाजवणार

## पुणे जिल्ह्यात राज्यातील आर्टिफिशियल इंटेलिजेन्सचा पहिला प्रयोग

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील काही तालुकांमध्ये मोठ्या प्रमाणावर बिबट्याचा वावर आहे. बिबट्या मानवी वस्तीत घुसून हल्ले करतात. त्यात अनेक वेळा पाळीव, प्राणी आणि मानवाचे मृत्यू झाले आहेत. गावांमध्ये बिबट्या दबक्या पावलांनी येतो आणि हल्ले करुन प्रसार होतो.

आता बिबट्याच्या बंदोबस्त करण्यासाठी वन विभागाने तंत्रज्ञानाची मदत घेतली आहे. पुणे जिल्ह्यात आर्टिफिशियल इंटेलिजेन्स (एआय) वापर करुन बिबट्याचा बंदोबस्त करण्यात येणार आहे. वनविभागाच्या जुन्नर विभागातर्फे बिबट्या ओळखण्यासाठी किंवा त्याचे वास्तव्य आहे की नाही ते समजण्यासाठी एआयचा वापर करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी जुन्नर विभागाने एआयची प्रणाली तयार केली आहे. त्यामुळे परिसरातील लोकांना बिबट्या त्या ठिकाणी असल्याचे कळणार आहे.

एआयद्वारे कॅमेरा ट्रॅप लावून बिबट्याची माहिती समजवण्यासाठी ही प्रणाली विकसित केली आहे. या एआय प्रणालीमुळे ५०० मीटरच्या परिसरातील बिबट्या किंवा इतर प्राण्यांचे छायाचित्र त्यात कैद होणार आहे. केवळ बिबट्या समोर आला तरच सायरन वाजणार आहे. इतर प्राणी आल्यावर सायरन वाजणार नाही.

कॅमेरा ट्रॅपमधील छायाचित्र क्लाऊडवर जाईल. त्या ठिकाणी प्राण्याच्या चित्रावर प्रक्रिया केली जाईल. बिबट्या असल्याचे स्पष्ट झाल्यास तो संदेश एआय प्रणालीकडे जाईल. त्यानंतर सायरन वाजणार आहे. सुनील चौरे यांनी ही प्रणाली तयार केली आहे. बिबट्यांच्या हालचालींचा डेटा एआय प्रणालीद्वारे संकलित होईल. बिबट्या दिसल्यास त्याची माहिती स्थानिक प्रशासनाला त्वरित दिली जाईल.




# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पिंपरीगाव ते पिंपळे सौदागर समांतर पुलाचे लोकार्पण

## पुलाचा लोकार्पण सोहळा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या शुभहस्ते संपन्न



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी येथील पिंपरीगाव ते पिंपळे सौदागर दरम्यान पवना नदीवरील समांतर पुलाचा लोकार्पण सोहळा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या शुभहस्ते संपन्न झाल्याची माहिती माजी नगरसेवक संदीप वाघेरे यांनी दिली.

याविषयी अधिक माहिती देताना वाघेरे म्हणाले कि, पिंपरी येथील पिंपरी येथील पिंपरीगाव ते पिंपळे सौदागर दरम्यान नदीवरील समांतर पुलाचे काम स्थापत्य प्रकल्प विभागामार्फत व्ही.एम.मातेरे या संस्थेला देण्यात आले होते. सदर पुलाचे काम पूर्ण होऊन आज महापालिकेच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या शुभहस्ते सकाळी ९ वाजता करण्यात आले.

यावेळी खासदार श्रीरंग बारणे, महापालिका आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, नगरसेवक संदीप वाघेरे, नाना काटे, शत्रुघ्न उर्फ बापू काटे, निकिता कदम, निर्मला कुटे, डब्बू आसवानी, सह शहर अभियंता प्रमोद ओंबासे, कार्यकारी अभियंता बापू गायकवाड, उपअभियंता अभिमान भोसले, कनिष्ठ अभियंता संतोष कुदळे, प्रणिता पिंजण सामाजिक कार्यकर्ते सतीश वाघेरे, अनिल रसाळ, बाबा मोरे, हनुमंत वाघेरे, सचिन गव्हाणे, कमलेश वाघेरे आदी मान्यवर उपस्थित होते. सदर पुलाचे लोकार्पण झाल्याने वाहतूक सुरु होऊन पिंपरी गाव, पिंपळे सौदागर, रहाटणी, काळेवाडी परिसरातील वाहतुकीचा ताण कमी होणार असल्याने नागरिकांच्या वतीने समाधान व्यक्त होत असल्याचे संदीप वाघेरे यांनी सांगितले.

# तळवडेतील बायोडायर्व्हसिटी पार्कची पायाभरणी

## राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची प्रमुख उपस्थिती; भाजपा आमदार महेश लांडगे यांचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराच्या लौकीकात भर घालणारा 'बायोडायर्व्हसिटी पार्क' (जैवविविधता उद्यान) तळवडे येथे विकसित करण्यात येत आहे. सुमारे ७० एकर जागेत होणारा हा प्रकल्पामुळे निसर्ग परिसंस्थेचा जीर्णोद्धार होणार आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे भूमिपूजन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले.

भोसरी विधानसभा मतदार संघातील भारतीय जनता पार्टीचे आमदार महेश लांडगे यांनी तळवडे येथे 'बायोडायर्व्हसिटी पार्क' विकसित करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. यासाठी त्यांनी महानगरपालिका, राज्य सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्याला यश मिळाले आहे. राज्य सरकारच्या 'माझी वसुंधरा' योजनेतून आणि केंद्र सरकारच्या माध्यमातून या प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करण्यात येणार आहे. दरम्यान, आमदार महेश लांडगे यांचे समर्थक आणि तळवडेतील ग्रामस्थांनी प्रस्तावित जागेत कोनशीला पूजन केले आणि प्रत्यक्षात भूमिपूजन समारंभ संपन्न झाला. यावेळी गोपाळ भालेकर, शांताराम भालेकर, रमेश भालेकर, संभाजी भालेकर, दत्तात्रय नखाते, बंडू भालेकर, रामदास मोरे, अस्मिता भालेकर, वैशाली भालेकर, सुषमा पाटील, निलेश भालेकर, शरद भालेकर, सोमनाथ मेमाणे, शंकर भालेकर, प्रमोद भालेकर, अमोल भालेकर, पंकज आवटे, युवराज भालेकर, सुरज काळोखे, महेश कुडपणे, महेश भालेकर, संपत भालेकर, भानाशेठ भालेकर, पांडुरंग भालेकर, पांडाभाऊ साने, दिनेश भालेकर, अमोल वाळुंज, किरण नखाते, रामदास कुटे, अजित भालेकर, बंटी भालेकर, सोन्या भालेकर, संपत बाठे आदी उपस्थित होते.



### .... असे आहे बायोडायर्व्हसिटी पार्क

» बायोडायव्हर्सिटी पार्कचे नियोजन सुमारे ७० एकर जागेत केले आहे. याठिकाणी देशी वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. किंबहुना जंगल विकसित करण्यात येणार आहे. प्राणी, पक्षी अधिवास या ठिकाणी निर्माण करण्यात येणार आहे. मृदा संवर्धन, विविध थीमद्वारे वृक्षारोपण, एन्ट्रान्स गेट, बर्ड नेस्ट वॉल, पार्किंग, गोल्फ कार्ट अँन्ड सायकल स्टेशन, ३ एन्ट्रान्स प्लाझा, अँम्फिथिएटर, सोयुवेनिअर शॉप, वर्कशॉप, कॅपे, बटरफ्लाय गार्डन, रिपेरिअन अँन्ड वेटलँन्डस, ऑर्चिडट्रम, थीम पार्क- कलर्स् अॅड कोअर फॉरेस्ट, टॉयलेट ब्लॉक्स, बायो डिझास्टर, किऑक्स, स्ट्रिम क्रॉसिंग, साइनेज, साईनेज अँन्ड ग्राफीक फॉर इकॉलॉजी अवेअरनेस, बेन्चेस, लाईटिंग- जनरल लाईटींग, पाथवेज, पिकनिक स्पॉट, रेस्टॉरंट एरिआ, ब्रिज लाईटिंग, व्हिजीबिलीटी लाईटिंग फॉर साईट, पब्लिक अॅड्रेस सिस्टीम, वेस्ट मॅनेजमेंट, साईल अँन्ड वेस्ट वॉटर मॅनेजमेंट असा अत्याधुनिक सोयी-सुविधांचा बायोडायव्हर्सिटी पार्क पिंपरी-चिंचवडच्या सौंदर्यामध्ये भर घालणार आहे.

> **पिंपरी-चिंचवड परिसरातील जैवविविधता टिकावी. त्याचे संवर्धन व्हावे. निसर्ग परिसंस्थेचे जतन व्हावे. भावी पिढीला स्वच्छ हवा आणि नैसर्गिक सहवास लाभावा. या करिता जैवविविधता उद्यान विकसित करण्याचा संकल्प केला होता. आज या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे भूमिपूजन झाले. याचे मोठे समाधान आहे. या प्रकल्पाला भेट देण्यासाठी जगभरातून पर्यटक येतील, असा विश्वास वाटतो.**
>
> **- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

महापालिका सहशहर अभियंता मनोज सेठिया म्हणाले की, तळवडे येथील जैवविविधता उद्यान मानव आणि निसर्ग यांच्यातील अधिक शाश्वत आणि सामंजस्यपूर्ण सहअस्तित्वाचा मार्ग प्रकाशित करेल. पुनर्संचयित उपक्रम, शैक्षणिक कार्यक्रम आणि सामुदायिक सहभाग याद्वारे पार्क जागरूक पर्यावरणीय कारभाराच्या परिवर्तनीय शक्तीचे उदाहरण देईल. या पुनरुज्जीवित लँडस्केपच्या सौंदर्याचा विचार करता भविष्यातील शहराच्या सौंदर्याला आकार देईल. जैवविविधतेचे संरक्षण ही केवळ गरज नाही, तर एक सामूहिक जबाबदारी आहे.

माझी वसुंधरा अभियानांतर्गत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेस अमृत गटात राज्य स्तरावर प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले आहे. तसेच, भूमी थीमॅटिक पार्कमधील उच्चतम कामगिरीसाठीही बक्षीस मिळाले आहे. अशी एकूण १० कोटी रुपयांची रक्कम प्रकल्पाच्या विकासासाठी खर्च करण्यात येणार आहे. तसेच, उर्वरित खर्च केंद्र शासनाच्या भांडवली गुंतवणुकीकरिता राज्यांना विशेष सहाय्य योजनेंतर्गत राज्य शासनास प्राप्त अर्थसहाय्य निधीमधून जैवविविधता उद्यान (बायोडायर्व्हसिटी पार्क) विकसित करण्यासाठी अर्थसहाय्य मिळवण्याबाबत पाठपुरावा सुरू आहे.

# महाराष्ट्रातही हरियाणातील विजयाची पुनरावृत्ती होणार : शंकर जगताप

## विधानसभा निवडणुकीत सर्व आघाडीच्या माध्यमांचा एक्झिट पोल खोटा

**पिंपरी | प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रातही हरियाणातील विजयाची पुनरावृत्ती होणार असल्याचा विश्वास पिंपरी चिंचवड भाजपाचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी व्यक्त केला आहे.



शंकर जगताप यांनी म्हटले आहे की, हरियाणा विधानसभा निवडणुकीत सर्व आघाडीच्या माध्यमांचा एक्झिट पोल खोटा ठरवत हरियाणाच्या सूज्ञ जनतेने कोणत्याही भूलथापा, खोटी आश्वासने व अपप्रचार यांना बळी न पडता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'सबका साथ; सबका विकास' या संकल्पनेला साथ देत हरियाणामध्ये तिसऱ्यांदा कमळ फुलवत 'हॅटट्रिक'ची किमया साधली. त्याबद्दल सर्वप्रथम हरियाणातील सर्व मतदार बंधू-भगिनींचे आभार मानतो.

लवकरच महाराष्ट्रातही विधानसभा निवडणुकीचा रणसंग्राम होणार असून हरियाणातील या विजयामुळे राज्यातील भारतीय जनता पक्ष आणि महायुतीतील घटक पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह वाढला आहे. हरियाणा विधानसभा निवडणुकीची पुनरावृत्ती साधण्यासाठी आम्हीही उत्सुक असून शहरातील चिंचवड, भोसरी आणि पिंपरी या तिन्ही जागांवर महायुतीचेच उमेदवार विजयी होतील, असा आम्हाला पूर्ण विश्वास असल्याचे शंकर जगताप यांनी म्हटले आहे.

# नागरी सेवा-सुविधांसाठी सुधारित दर लागू

## विविध विषयांना प्रशासक शेखर सिंह यांनी झालेल्या विशेष बैठकीत मान्यता दिली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या नगररचना व विकास विभागामार्फत नागरिकांना देण्यात येणाऱ्या विविध नागरी सेवा सुविधांसाठी सुधारित दर निश्चित करण्यात आले आहेत. या विषयांसह विविध विषयांना प्रशासक शेखर सिंह यांनी आज झालेल्या विशेष बैठकीत मान्यता दिली.

महापालिकेत झालेल्या बैठकीत महापालिका सभा आणि स्थायी समिती सभेची मान्यता आवश्यक असलेले विविध विषय प्रशासक सिंह यांच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आले होते.या विषयांना प्रशासक सिंह यांनी मान्यता दिली. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर यांच्यासह विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.



महापालिका ही देशातील तसेच महाराष्ट्रातील वेगाने वाढणारे शहर असून गेल्या २० वर्षात शहरातील लोकसंख्या झपाट्याने वाढली आहे. महाराष्ट्र शासनाची एकत्रितकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीनुसार (युडीसीपीआर-२०२०) नवीन नागरी सुविधा सेवांचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

त्यानुसार नगररचना व विकास विभागामार्फत नागरिकांना देण्यात येणाऱ्या विविध नागरी सेवा सुविधांबाबतच्या सेवा शुल्कामध्ये सुधारणा करणे व नवीन सेवा आणि सेवांसाठीचा दर निश्चित करणे आवश्यक होते.

तसेच, महापालिकेमार्फत नागरिकांना नागरी सेवा पुरविताना मोठ्या प्रमाणावर आर्थिक ताण येत असल्याने महापालिकेच्या महसुलात वाढ होण्यासाठी या सुधारित शुल्काबाबतच्या २३ सेवा व त्यांचे दर निश्चितीच्या विषयाला प्रशासक सिंह यांनी आज मान्यता दिली.

महापालिकेच्या अग्निशमन विभागासाठी एक फ्लड रेस्क्यू व्हॅन खरेदी करणे, २०२१ ते २०२४ या तीन वर्षातील एकेरी पद्धतीने तयार केलेल्या वार्षिक लेख्यांना मान्यता देणे,

महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये आवश्यक उपकरणे खरेदी करणे, तसेच महापालिकेच्या सर्व माध्यमिक शाळांमध्ये उभारण्यात आलेल्या सीसीटीव्ही यंत्रणेची वार्षिक तत्वावर देखभाल दुरुस्ती करणे आदी विषयांना प्रशासक सिंह यांनी आज मान्यता दिली.

# सरकारचे धोरण चुकीचे : शरद पवार

## जेजुरीत विविध विकासकामांचे भूमिपूजन, लोकार्पण त्यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

**पुणे | प्रतिनिधी**

एखादी योजना घाईने जाहीर करायची अमलात आणायची नंतर खर्च कशासाठी करतो आहोत याची उत्तरे देता येत नाहीत, असे सरकार चुकीचे धोरण राबवत आहे. राज्यातील विविध ठेकेदारांचे सुमारे 48 हजार कोटी रुपये थकविण्यात आले आहेत ते सर्वजण आंदोलनाच्या तयारीत आहेत.

स्व.यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक यांनी अभ्यासपूर्ण आर्थिक नियोजन करून राज्य प्रगतीपथावर नेण्याचे काम केले मात्र सध्याचे सरकारचे काम पाहता असे राज्यकर्ते कधीही पाहिले नाहीत, अशी टीका माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी केली.

आमदार संजय जगताप यांच्या संकल्पनेतून व शासन निधीतून जेजुरी पोलीस ठाण्यालगत उभारण्यात आलेल्या मल्हार नाट्यगृहाचे, राजमाता अहिल्यादेवी होळकर उद्यान टप्पा क्र.1, महात्मा फुले भाजी मार्केट, नवीन शासकीय विश्रामगृह आदी विकासकामांचे उद्घाटन व लोकार्पण मंगळवारी (दि. 8) शरद पवार यांच्या हस्ते करण्यात आले तसेच अद्ययावत बसस्थानक, लगतच छत्रपती शिवरायांचा अश्वारूढ पुतळा, मुख्य चौकात महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा, मोरगाव -नीरा बायपास रस्ता आदी विकास कामांचे डिजिटल प्रणालीद्वारे भूमिपूजन त्यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.



> पुणे हे सांस्कृतिक वारसा जपणारे शिक्षणाचे माहेरघर असून येथे महिला व मुली सुरक्षित नाहीत ही अत्यंत गंभीर बाब आहे. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून आमचा निधी अडवून अनेक विकासकामांना अडथळा आणण्याचे काम सध्याच्या सरकारने केले आहे
>
> **- सुप्रिया सुळे, खासदार.**

> सध्याचे सरकार हे ठेकेदारांचे असून टक्केवारीशिवाय कामे होत नाहीत. तीर्थक्षेत्र विकास आराखडा तयार करण्याचे काम खासदार सुळे आणि मी केले पण, केवळ नागरिकांच्या समस्या सोडवण्याऐवजी इतर प्रश्न निर्माण करीत लक्ष विचलित करायचे विकासकामांच्या निधीला कोलदंडा टाकून कामे अडवून ठेवायचे हे धोरण राबविल्यानेच मागील काळात मोठ्या पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे.
>
> **- संजय जगताप, आमदार, पुरंदर-हवेली.**

### भाजपकडून काळे झेंडे दाखवण्याचा प्रयत्न

**» जेजुरीत उद्घाटन करण्यात आलेले नाट्यगृह हे केंद्र सरकार व राज्य शासनाच्या निधीतून बांधण्यात आले आहे. याच्या उद्घाटनाचाकार्यक्रम नगरपालिकेने आयोजित न करता कॉंग्रेस व पवार गटाने हा खासगीपक्षीयकार्यक्रम आयोजित केला, असा आरोप करीत काळे झेंडे दाखवण्याचा प्रयत्न करणाऱ्या भाजपच्या 30 ते पस्तीस कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खासदार सुप्रिया सुळे, स्वागताध्यक्ष आमदार संजय जगताप, प्रमुख पाहुणे संभाजी ब्रिगेडचे प्रवीण गायकवाड, संभाजीराव झेंडे, सुदामराव इंगळे, विजय कोलते,

राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष जगन्नाथ शेवाळे, कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रदीप पोमण, माणिक झेंडे, माजी नगराध्यक्षा वीणा सोनवणे, ज्येष्ठ नेते दिलीप बारभाई, दत्ताजी चव्हाण, ज्येष्ठ कलावंत लीला गांधी आदींसह जेजुरी नगरपालिकेचे सर्व माजी नगरसेवक पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुणे शहराच्या जवळ असलेल्या ऐतिहासिक पुरंदरला महापुरुषांचा मोठा वारसा लाभलेला असून आमदार संजय जगताप यांच्या माध्यमातून अनेक विकास कामे मार्गी लागली असून छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक व्हावे यासाठी त्यांनी 16 एकर स्वतःची जमीन उपलब्ध करून दिली आहे.

पुढील काळात तालुक्यामध्ये प्रलंबित असलेले आंतरराष्ट्रीय विमानतळ व्हावे. बाधित असलेल्या शेतकऱ्यांची अशी अपेक्षा प्रवीण गायकवाड यांनी व्यक्त केली.

जेजुरी नगरीचा विस्तार आणि विकासाला चालना द्यायची असेल तर ग्रामीण भागातील वाड्यावस्त्या पालिकेमध्ये समाविष्ट करणे गरजेचे आहे असे मत सुदामराव इंगळे यांनी मांडले.

तर पुढील काळात शरद पवार जो निर्णय घेतील त्या विचारांशी बांधील राहून सर्वजण कार्यरत राहतील असे दिलीप बारभाई यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक हेमंत सोनवणे यांनी तर अजिंक्य देशमुख यांनी आभार मानले.

# स्कूलबसमध्ये आता स्वतंत्र महिला कर्मचारी अनिवार्य

## सर्व शाळांसाठी नियम, अल्पवयीन विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी पुणे आरटीओचा पुढाकार; स्वतंत्र संकेतस्थळाद्वारे नियम पालनावर देखरेख

**पुणे | प्रतिनिधी**

काही दिवसांपूर्वी एका स्कूल व्हॅन चालकाकडून सहा वर्षांच्या दोन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याच्या घटनेनंतर पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) शाळांना शालेय वाहनांसाठी महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याचे आदेश दिले आहे.

याबरोबरच एक वेबपोर्टल सुरू केले आहे जेथे शाळा परिवहन समित्या अहवाल सादर करू शकतात. पुणे प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी सांगितले की, "नियमानुसार शाळांमध्ये शालेय परिवहन समिती (एसटीसी) स्थापन करणे बंधनकारक आहे. या समितीमध्ये पोलीस, आरटीओ अधिकारी आणि पालक प्रतिनिधी यांचा समावेश आहे. शाळा स्कूल बस सुरक्षा नियमांचे पालन किती चांगल्याप्रकारे करत आहेत यावर लक्ष ठेवण्यासाठी वेबसाइटG) तयार करण्यात आली आहे."



गायकवाड पुढे म्हणाल्या की, स्कूल व्हॅन आणि बसमधून प्रवास करणाऱ्या मुलांची सुरक्षितता वाढवण्यासाठी, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेवर देखरेख ठेवण्यासाठी शाळा अधिकाऱ्यांना वाहनांमध्ये महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याचे निर्देश दिले आहेत.

वेबपोर्टलवर विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसंदर्भातील सर्व तपशील शाळांनी सादर करणे बंधनकारक आहे आणि आम्ही अहवालांचे नियमितपणे पुनरावलोकन करू. उल्लंघन करणाऱ्या शाळांवर कारवाई करण्याची सूचना शिक्षण विभागाला करण्यात येईल,' असे अर्चना गायकवाड यांनी सांगितले. या अधिकाऱ्यांनी नमूद केले की, पालक पोर्टलवर शाळांनी सादर केलेले अहवालदेखील तपासू शकतात आणि शालेय वाहनांनी मार्गदर्शक तत्त्वांचे पालन न केल्यास आरटीओकडे तक्रार दाखल करू शकतात.

### आरटीओने नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर कारवाई

**» उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्नील भोसले म्हणाले, "आरटीओने नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी स्कूल बस आणि व्हॅनची तपासणी सुरू केली आहे. यासाठी २० अधिकारी आणि इतर कर्मचाऱ्यांसह दहा पथके नेमण्यात आली आहेत. हे पथक वाहतूकदार शालेय विद्यार्थी वाहतूक नियमांचे पालन करत आहेत की नाही, हे तपासत आहेत. याशिवाय, मुख्याध्यापकांची बैठक घेऊन आरटीओ अधिकारी शाळांमधील विद्यार्थी वाहतूक व्यवस्थेचा आढावा घेत आहेत. त्याचे पालन व्हावे, यासाठी वारंवार सूचना दिल्या जात आहेत."**